साप्ताहिक

परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २५ मार्च २०२४ * पाने-४ * ₹ २/- www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या
आकर्षक छपाईसाठी...
न्यू
सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर,
परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

पतसंस्थांमधील घोटाळे व गैरव्यवहाराने परळीसह जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला मोठा फटका; अनेकांच्या स्वप्नांची 'होळी!'

परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):– परळीसह बीड जिल्ह्यातील अनेक नागरी सहकारी व मल्टीस्टेट पतसंस्थामधील आर्थिक घोटाळे व गैरव्यवहारामुळे या शहरासह बीड जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला असून अनेक कुटुंबे देशोधडीला लागली आहेत. यामुळे अनेकांच्या स्वप्नांची अक्षरशः 'होळी' झाली आहे. या गैरव्यवहाराबाबत कुणीही 'ब्र' शब्द काढत नाही की रस्त्यावर उतरुण तीव्र संघर्ष करत नाही, याचे सर्वांना आश्चर्य वाटते आहे.

सबंध देशाला 'सहकाराचा' आदर्श घालून देणाऱ्या आपल्या महाराष्ट्रात सहकार चवळवळ वाढीस लागली. सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, दूध संघ, गृहनिर्माण संस्था, नागरी पतसंस्था यांसह विविध सहकारी संस्था जन्माला आल्या, त्या भक्कमपणे उभ्या झाल्या. यामुळे शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्यांच्या जीवनात मोठी आर्थिक क्रांती घडली. आर्थिक विकासाच्या नवनव्या वाटा उदयाला आल्या. या संस्थांमुळे अनेकांना रोजगार मिळाला. राजकारण्यांची सोय झाली. कित्येकांची दुकानदारी सुरू झाली. राज्यात लाखो, कोटीची उलाढाल सहकाराच्या माध्यमातून सुरू झाली.

सर्वसामान्यांची विना विलंब आर्थिक गरज भागवण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून सहकारी बँका, पतसंस्थांनी येथे जन्म घेतला. राष्ट्रीयीकृत बँका पेक्षा या संस्थांचे सोपे, सुलभ व्यवहार सर्वसामान्यांना सोयीचे व विना अडचणीचे वाटू लागले. ठेवीवर अधिक व्याज मिळू लागल्याने ठेवीदारांची पावले पतसंस्थंच्या दारात पडू लागली. गरजूंना कोणतेही कर्ज झटपट मिळू लागल्याने पतसंस्था लोकाभिमुख झाल्या. अनेक पतसंस्थांनी विविध उपक्रम सुरू केले. आर्थिक क्षेत्रात आदर्श घालून देणाऱ्या अनेक संस्थांनी सामाजिक उपक्रम करुन, सामाजिक क्षेत्रातही आपला आदर्श उभा केला. या संस्थांमुळे हजारो गरजवंतांची आर्थिक गरज पूर्ण झाली. हजारो जणांना रोजगार मिळाला, नागरिकांना बचतीची सवय लागली. आर्थिक मदतीमुळे सर्वसामान्यांच्या जीवनस्तर सुधारला.

आपल्या बीड जिल्ह्यात १९८०-९० च्या काळात परळी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब काळे, विठ्ठलराव आमले, हरिश्चंद्र पाटील, राजाभाऊ बावणे, श्री लेणेकर, काशीनाथराव वरपे आदी मंडळींनी 'विना सहकार नही उद्धार' हे ब्रीद उराशी बाळगून परळी शहरात श्री ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था सुरू केली. बीड जिल्ह्यातील ही पहिली सहकारी पतसंस्था होती. या पतसंस्थेमुळे परळी शहर व पंचक्रोशतील सर्वसामान्यांच्या जीवनात त्याकाळी आर्थिक विकासाची नवी पहाट निर्माण केली. या संस्थेचा आदर्श घेवून पुढे अनेक सहकारी पतसंस्था जिल्ह्यात जन्माला आल्या आणि समर्थपणे चालू लागल्या. पुढील काळात सोय व शाखा विस्तारासाठी अनेक संस्थांनी मल्टीस्टेट मध्ये आपल्या संस्थांचे वर्गीकरण केले. या संस्थांच्या कारभारावर सर्वसामान्यांचा विश्वास वाढू लागल्याने त्या लोकाभिमुख झाल्या. लाखो, कोटीची उलाढाल या पतसंस्थांमधून सुरू झाली. आपल्या तत्पर सेवेने, चांगल्या कामाने व लोकप्रियतेने अनेक पतसंस्थांनी अनेक नागरी सहकारी बॅकांनाही मागे टाकले.

'सहकारात' काहींचा स्वार्थ घुसल्याने व पतसंस्था म्हणजे आपल्या बापदादाची खासगी मालमत्ता आहे असे काही संस्थाचालक वागू लागल्याने व संस्थेत मनमानी सुरू झाल्याने अनेक सहकारी पतसंस्थांचे आर्थिक घोटाळे व गैरव्यवहार चव्हाट्यावर आले. पतसंस्थांमध्ये सर्वसामान्यांनी ठेवलेल्या कष्टाच्या पैशावर काही गिधाडांनी डल्ला मारल्याने मोठा आर्थिक भूकंप परळीसह जिल्ह्याच्या आर्थिक क्षेत्रात झाला आहे. एका पाठोपाठ एक संस्थांचे घोटाळे बाहेर येत असल्याने या संस्थेत ठेवी ठेवणारे सर्वसामान्य गोंधळून गेल्याने आपल्या ठेवी परत मिळवण्यासाठी त्यांची संस्थांच्या दारात पायपीट सुरू झाली. ठेवीदाराला ठेवी परत करता येत नसल्याने अनेक पतसंस्थांनी आपल्या कार्यालयाला कुलूप लावले आहे. कुणी पोरांच्या लग्नासाठी, शिक्षणासाठी, घर बांधणीसाठी तसेच इतर दैनंदिन आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी पै पै करुन, रात्रंन् दिवस कष्ट करुन, लेकराबाळांचे तोंड मारुन, दाताचे पाणी गिळून जमवलेला पैसा या संस्थेमध्ये ठेव म्हणून ठेवला. विश्वास व जादा व्याजाच्या अमिषाला बळी पडलेल्या या सर्वसामान्य ठेवीदारांची ठेव परत मिळत नसल्याने ते मोठे चिंताग्रस्त झाले आहेत. कुलूप ठोकलेल्या पतसंस्थांच्या दारात चकरा मारुन थकले आहेत. अनेकांची झोप उडाली आहे. कुणी सततच्या विचाराने वेड्यासारखे वागत आहेत. अनेकांच्या मनावर परिणाम झाला आहे.

सर्वसामान्यांच्या लाखोच्या ठेवी बंद पडलेल्या पतसंस्थांमध्ये अकडकल्या आहेत. यामुळे बीड जिल्ह्याच्या बाजारपेठेवर, बाजारपेठेतील उलाढालीवर एकूण जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेवर मोठा गंभीर परिणाम झाला आहे. बंद पडलेल्या व घोटाळ्यात अडकलेल्या संस्थांमुळे चांगले काम करणाऱ्या पतसंस्थंच्या कारभारावरही परिणाम झाला आहे. पतसंस्थेच्या गैरव्यवहाराबाबत व घोटाळ्याबाबत कोणताही सामाजिक कार्यकर्ता, राजकारणी पुढे येऊन रस्त्यावर उतरुन या प्रश्नी संघर्ष का करत नाही, याचे सर्वांना आश्चर्य वाटते आहे. घोटाळ्यात अडकलेल्या व सध्या कुलपात बंद असलेल्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांचे कुटुंबे उध्दवस्त झाली आहेत. अनेकजण मोठ्या आर्थिक विवंचनेत अडकले आहेत. तर लोक पैसे मागत असल्याने अनेक कर्मचारी गाव सोडून इतरत्र गेले आहेत. कुणी तोंड लपवत फिरत आहेत.

(क्रमशः) पुढील अंकात यापुढील...

जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत परळीत विविध विषयांवर बैठक

बीड (जिमाका): जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या उपस्थीतीत पाणी,चारा टंचाई, मनरेगा तसेच ३९ बीड लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने २३३-परळी विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक परळी तहसील कार्यालयात शनिवारी (दि.२३) झाली.

या बैठकीस तालुक्यातील सर्व विभागांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. यावेळी परळी तालुक्यातील पाणी, चारा टंचाई तसेच निवडणूक ही संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि नागरिकांना पाण्याची कमतरता होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी असून पशुधनाला चाराने कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी असे सांगितले. निवडणुकीच्या काळात महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण केली जाऊ शकतात त्यामुळे या अंतर्गत असणारी कामे सुरू ठेवण्याबाबत निर्देशित केले. बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघ संवेदनशील असून या मतदारसंघात आचारसंहितेचे सर्व नियमांचे पालन व्हावे तसेच कुणीही आदर्श आचारसंहितेच भंग होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. विविध निवडणूक कक्षाला यावेळी जिल्हाधिकारी यांनी भेट दिली. **

महासंवाद बैठक ; २६ जणांविरुद्ध गुन्हा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- सकल मराठा समाजाच्या वतीने परळी वैजनाथ येथे मनोज जरांगे-पाटील यांची महासंवाद बैठक दि.२० रोजी आयोजित करण्यात आली होती. या अनुषंगाने या बैठकीला प्रशासनाने नाकारण्यात आलेली परवानगी न्यायालयाने दिल्यानंतर कार्यकर्त्यांनी जमा होत फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष केला होता.या प्रकरणात २६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथे दि. २०.०३.२०२४ रोजी जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले व सन २०२४ चे सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे आदर्श आचारसंहितेचे अनुषंगाने जिल्हाधिकारी बीड यांचे आदेशाचे उल्लघंन केले म्हणुन २६ जणांविरुद्ध पोलीस ठाणे परळी शहर येथे गु.र.नं. ४६/२०२४ कलम १८८ भा.द.वि. सह कलम १३५ म. पो. अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पो.ना. १९१८ भताने हे करीत आहेत.

सध्या लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागलेली आहे. परळी येथे होणाऱ्या कार्यक्रमास पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली होती. तसेच याप्रकरणी २८ जणांना नोटीसही दिल्या होत्या . या बैठकीच्या परवानगीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दाद मागण्यात आली होती. यावर न्यायालयाने या महासंवाद बैठकीला परवानगी दिली. सकल मराठा समाजाने अटी व शर्तींच्या अधीन राहून ही सभा घ्यावी अशी परवानगी दिली.

न्यायालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर परळीत सकल मराठा समाजाच्या वतीने चौका चौकात फटाके फोडून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला होता मात्र हा जल्लोष सातारा महागात पडला असून याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **

जेल मध्ये सडलो तरी चालेल पण समाजाशी गद्दारी कधीच करणार नाही-मनोज जरांगे पाटील

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

मराठा समाजाने आपल्याला खूप प्रेम दिले आहे, समाजाच्या प्रश्नासाठी आपला संघर्ष कायम आहे, आपल्यावर व कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे कारणास्थान चालू आहे, जेलमध्ये सडलो तरी चालेल पण समाजाशी गद्दारी कधीच करणार नाही, असे प्रतिपादन मराठा आरक्षणाचे संघर्ष योद्धे मनोजदादा जरांगे पाटील यांनी परळी येथील मोंढा मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या संवाद बैठकीत केले.

गेल्या बुधवारी (दि.२०) ही बैठक झाली. बैठकीचे रुपांतर जाहीरसभेत झाले. यावेळी हजारो संख्येने समाज बांधव व इतर नागरिक उपस्थित होते. या सभेच्या निमित्ताने मोठे शक्तीप्रदर्शन झाले. पुढे बोलताना श्री पाटील म्हणाले, सगेसोयऱ्याच्या अधिसूचनेबाबत सरकारने कुठलाही निर्णय न घेता मराठा समाजाची फसवणूक केली आहे, आचारसंहितेचे कारण पुढे करून सरकारने डाव टाकला आहे. आता आम्ही डाव टाकणार आहोत असे श्री पाटील म्हणाले. कार्यकर्त्यावर खोटे गुन्हे व दडपशाही सरकारच्या इशाऱ्यावरून सुरू आहे. ती बंद करा. आचारसंहितेच्या नावाखाली चालवली जाणारी दडपशाही मराठा समाज खपवून घेणार नाही. आचारसंहिता संपणारच आहे मग यांच्याशी खेटू असा सज्जड इशारा श्री पाटील यांनी यावेळी दिला. दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची बुधवारी परळी वैजनाथ येथे महासंवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रशासनाच्या वतीने आचारसंहितेचे कारण सांगून या महासंवाद बैठकीला परवानगी नाकारण्यात आली होती. यामुळे परळीची मनोज जरांगे-पाटील यांची महासंवाद बैठक चर्चेत आली होती. दरम्यान सकल मराठा समाजाच्या वतीने या बैठकीच्या परवानगीसाठी उच्च न्यायालयाचे दरवाजेही ठोठावण्यात आले. त्यानंतर बुधवारी उच्च न्यायालयाने या बैठकीला सशर्त परवानगी दिली. मनोज जरांगे-पाटील यांचे परळीत आगमन होताच. जागोजाग पुष्पवृष्टीने व घोषणांनी स्वागत करण्यात आले. चौकाचौकात जेसीबीने हार घालून भव्यदिव्य स्वागत झाले. बैठकीच्या स्थळी येण्यापूर्वी मनोज जरांगे-पाटील यांनी बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाची पूजा करून दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेकडकर यांच्या पुतळयालाही अर्पण केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी मोठा जयघोष केला. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

20 March 2024 9:02 pm

संवाद बैठकीला संबोधित करताना मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या शैलीत सरकारवर ताशेरे ओढले. पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, आंदोलनात व समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या निष्पाप कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. संपूर्ण राज्यात दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले. मात्र सरकार वारंवार मराठा समाजाला फसवत असल्याचा आरोप मनोज जरांगे-पाटील यांनी यावेळी केला. गृहमंत्र्यांनी मराठा समाजाबद्दलचा द्वेष करणे सोडून द्यावे. सगे सोयरे परिपत्रक सरकारनेच दिले होते. त्याची अंमलबजावणी केली नाही. या ठिकाणीही सरकारने आपली फसगतच केली आहे असे सांगून मराठा समाजाने आपली एकजूट कायम ठेवावी. आपल्यात फूट पाडण्यासाठी असंख्य प्रयोग केले जात आहेत. मात्र आपली ही एकजूट अभेद्य ठेवावी असे आवाहन श्री पाटील यांनी केले.

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रयोग सुरू आहेत. मात्र आम्हीही कायद्याला मानणारे नागरिक आहोत. न्याय देवता आम्हाला वेळोवेळी न्याय देणारच आहे. आज आचारसंहितेच्या नावाखाली मराठा समाजाला दबावात घेण्याचे आणि दडपशाही करण्याचे धोरण सरकारच्या इशाऱ्यावरून प्रशासन करत आहे. मात्र तुम्ही आमचे बॅनर, पोस्टर काढू शकता मात्र आमची एकजूट तोडू शकणार नाहीत. आज आचारसंहिता आहे ठिकय ही आचारसंहिता संपणारच आहे.

एकदा आचारसंहिता संपू द्या, मग यांना खेटू अशा शब्दात त्यांनी या सभेतून सरकारला सज्जड इशारा दिला. दरम्यान, ही सभा यशस्वी करण्यासाठी परळी तालुका व पंचक्रोशीतील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. अनेकांनी योगदान दिले. सभेला असलेली गर्दी व झालेले शक्तीप्रदर्शन याची मोठी चर्चा परळीसह जिल्ह्यात होत आहे. **

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्यात याव्यात

मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- भविष्य निर्वाह निधी पावत्या नसल्यामुळे आवश्यक बाबींसाठी या खात्यामधून रकमा काढण्यात राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे भविष्य निर्वाह निधीच्या प्रलंबित पावत्या देण्यात याव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी व शालेय शिक्षण मंत्री दिपकजी केसरकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की राज्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमधे दरमहा गुंतवणूक करत असतात. दरवर्षी कर्मचारी शिक्षकांच्या गुंतवणूकीचा हिशेब देणा-या पावत्या दिल्या जातात. मुलांची लग्ने, आजारपण व तत्सम कारणांसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या खात्यामधून परतावा/ नापरतावा पध्दतीने रक्कम उचलत असतात. परंतु गेली तीन वर्षांपासून राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आपल्या भविष्य निर्वाह निधी खात्यात किती रक्कम जमा आहे याबद्दल राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी अनभिज्ञ आहेत.

आवश्यक कारणांसाठी रक्कम काढण्यात त्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांच्यामधे असंतोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तीन वर्षांपासून प्रलंबित भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दिपकजी केसरकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती बंडू अघाव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. ***

लोकशाहीला सशक्त करणाऱ्या निवडणुकांमध्ये पत्रकारांचे सहकार्य मोलाचे : जिल्हाधिकारी

बीड, (जिमाका):- लोकशाहीला सशक्त करणाऱ्या निवडणुकांमध्ये पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असते. बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात होणाऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये पत्रकारांचे सहकार्य मिळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी यावेळी केले. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ जाहीर झाली असून चौथा टप्प्यात बीड जिल्ह्यात १३ मे ला मतदान होणार आहे या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी आज पत्रकार परिषदेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले, त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते. निवडणुकीच्या काळात वर्तमानपत्राची भूमिका महत्त्वाची असून आदर्श आचार संहितेचे पालन वर्तमानपत्राकडूनही व्हावे, असे सांगून वर्तमानपत्रांनी यावेळी कुठल्याही पक्षाला अधिक महत्त्व न देता वस्तुनिष्ठ पद्धतीने बातम्या द्याव्यात, अशी अपेक्षा केली जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. निवडणुकीदरम्यान विविध समित्या गठित करण्यात येतात या अंतर्गत माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती तसेच माध्यम कक्ष गठित करण्यात आलेले आहे. माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच डिजिटल माध्यमांमध्ये गैरवाजवी पद्धतीने देण्यात येणाऱ्या बातम्यांवर करडी नजर ठेवणार असल्याचे सांगितले. एखाद्या मुद्रित, इलेक्ट्रॉनिक सामाजिक माध्यमावर आक्षेप असणाऱ्या बातमी आल्यास बातमी देणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. त्यामुळे सर्वांनी निवडणुकीला पोषक असणाऱ्या बातम्या देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. एक सारख्या मथळ्याच्या असणाऱ्या बातम्या अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित होत असून या बातम्या पेड न्यूज अंतर्गत मोडले जातात असे आढळून आल्यास वर्तमानपत्रावर कारवाई करण्यात येईल. शासन मान्यता यादीवर नसलेले तसेच अनाधिकृतपणे काढले जाणाऱ्या वर्तमानपत्रावरही कारवाई होणार असल्याने यापुढे सर्वांनीच दक्षता घ्यावी असेही, जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. विविध समाज माध्यमांवर चर्चा सत्रे आयोजित केली जातात यामध्ये लोकशाहीला अनुरूप आणि पोषक अशा चर्चा व्हाव्यात, अशी अपेक्षाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. ***

HOLI Special...



होळी विशेष...

व्हाटस्‌ॲपवर विविध मजकूर व्हायरल होत असतो. चांगले विचार, प्रतिक्रिया, माहिती इतर गोष्टी, त्यातच कविताही व्हायरल होतात. या कविता पुन्हा पुन्हा वाचल्या जातात. त्यातील अनेक कविता कुणी लिहिलेल्या आहेत माहित नसते. त्यांचा अर्थ मनात खोलवर जातो. काही कवितांचा संग्रह होतो. अशाच व्हाटस्‌ॲपवर व्हायरल झालेल्या कविता या होळी विशेष अंकात देत आहोत. होळीनिमित्त केवळ मनोरंजनासाठी हा वेगळा उपक्रम आहे. कुणाच्याही भावना दुखवण्याचा आमचा हेतू नाही.....

– संपादक.

पूर्वीचा काळ...

पूर्वीचा काळ बाबा,
खरंच होता चांगला,
साधे घरं साधी माणसं,
कुठे होता बंगला ?
घरं जरी साधेच पण,
माणसं होती मायाळू,
साधी राहणी चटणी भाकरी,
देवभोळी अन श्रद्धाळू.
सख्खे काय चुलत काय,
सगळेच आपले वाटायचे,
सुख असो दुःख असो,
आपुलकीने भेटायचे.
पाहुणा दारात दिसला की,
खूपच आनंद व्हायचा हो,
हसून खेळून गप्पा मारून,
शीण निघून जायचा हो.
श्रीमंती जरी नसली तरी,
एकट कधी वाटलं नाही,
खिसे फाटके असले तरीही,
कोणतंच काम रुकलं नाही.
उसनं पासनं करायचे पण,
पोटभर खाऊ घालायचे,
पैसे आडके नव्हते तरीही,
मन मोकळं बोलायचे.
कणकेच्या उपम्या सोबत,
गुळाचा शिरा हटायचा,
पत्रावळ जरी असली तरी,
पाट, तांब्या मिळायचा.
लपाछपी पळापळी,
बिन पैशाचे खेळ हो,
कुणीच कुठे busy नव्हते,
होता वेळच वेळ हो.
चिरेबंदी वाडे सुद्धा,
खळखळून हसायचे,
निवांत गप्पा मारीत माणसं,
ओसरीवर बसायचे.
सुख शांती समाधान ते
आता कुठे दिसते का ?
पॉश पॉश घरा मधे,
तशी मैफिल सजते का ?
नाते गोते घट्ट होते,
किंमत होती माणसाला,
प्रेमामुळे चव होती,
अंगणातल्या फणसाला.
तुम्हीच सांगा नात्या मध्ये,
राहिला आहे का राम ?
मुलीकडे आईचा हो,
असतो का मुक्काम ?
सख्खे भाऊ सख्ख्या बहिणी,
कुणीच कुणाला बोलत नाही,
मृदंगाच्या ताला वरती,
गाव आता का डोलत नाही.
प्रेम, माया, आपुलकी हे,
शब्द आम्हाला गावतील का?
बैठकीतल्या सतरंजीवर,
पुन्हा पाहुणे मावतील का ?

***

फॅशन वाटते...

नदीत किंवा तलावात आंघोळ
करायला लाज वाटते, आणि
स्विमींग पूलमध्ये पोहण्याला
फॅशन वाटते.
गरीबाला एक रुपया दान
नाही करु शकत, आणि
वेटरला मात्र १० रु.टिप देण्यात
मोठेपणा वाटतो.
पंक्तीत बसून जेवणे ही जुनी
पध्दत वाटते, आणि
पार्टीत खाण्यासाठी रांग
लावण्यात छान वाटते.
बहीण काही मागत असेल तर
फालतू खर्च वाटतो, आणि
गर्लफ्रेंडच्या डिमांडला सौभाग्य
समजले जाते.
गरीबाकडून भाजी घेण्यात
कमीपणा वाटतो, आणि
शॉपिंग मॉलमध्ये,आपला
खिसा रिकामा करण्यात
अभिमान वाटतो.
जगात श्रीमंत कोण ?
ज्याला आई बाप आहेत तो
जगात यशस्वी कोण ?
ज्याला आई बापाची कींमत
कळाली तो
जगात महान कोण ?
ज्याने आई बापाची
स्वप्न पुर्ण केली तो आणि
जगात नालायक कोण ?
ज्याने आईबापाला वृद्धाश्रमात ठेवले.
त्रास दिला. छळले.
तो नालायक.
मेल्यावर मेलेल्या आईबापाच्या
मढ्यावर सगळेच बोंबलून रडतात
खरा पुत्र तो जो जिवंतपणी
त्यांची सेवा करतो. **

मानस होळी...

कराया साजरा । होलिकेचा सण ।
मनाचे स्थान । निवडीले ।।
ऐसे ते स्थान ।
साधने सरावले ।
भक्तीने शिंपिले ।
केले सिद्ध ।।
त्या स्थानी खळगा ।
समर्पणाचा केला ।
त्यात उभा ठेला ।
अहंकार एरंड ।।
रचलीया तेथे।
लाकडे वासनांची ।
इंद्रीयगोवऱ्याची ।
रास भली ।।
गुरुकृपा तैल । रामनाम घृत ।
अर्पिले तयात । ऐसे केले ।।
रेखिली भोवती ।
सत्कर्म रांगोळी ।
भावरंगाचे मेळी ।
शोभिवंत ।।
वैराग्य अग्नीसी । तयाते स्थापिले ।
यज्ञरूप आले । झाली कृपा ।।
दिधली तयाते ।
विषय पक्वान्नाहुती ।
आणिक पुर्णाहूती ।
षड्रिपु श्रीफळ।।
झाले सर्व हुत ।
वैराग्य अग्नीत ।
जाणावया तेथ ।
नूरले काही ।।
वाळ्या म्हणे जनी ।
व्हावी ऐसी होळी ।।
जेणे मुक्तीची दिवाळी।

***

दारात उभे म्हातारपण..

दारात उभे म्हातारपण
त्याला आत घेणार नाही
उत्साहाने बाहेर भटकेन
त्याकडे लक्ष देणार नाही !१!
उभा राहूदे दारात त्याला
ढुंकूनही बघणार नाही
आजही मी तरुण आहे
त्यास घरात घेणार नाही !२!
जन्मा बरोबर असलेला
मृत्यू मला ठाउक आहे
उत्साहाने बाहेर भटकेन
जरी तो माझ्या मागे आहे !३!
विसरेन जन्म तारीख
म्हातारपणाला थारा नको
किती मी चंद्र पाहिले
त्याचा हिशोब ठेवायला नको !४!
सुरकुतलेल्या चेहऱ्यावर
तारुण्याची चमक असेल
उत्साहाने काम करण्याची
हातापायात धमक असेल !५!
प्रेम देईन, प्रेम घेईन
मित्रांच्या सहवासात राहीन
दररोज संध्या झाली की
एकच पेय प्रेमरस पीईन !६!
हाकला त्या म्हातारपणाला
जन्म तारीख विसरून जा,
सकाळ झाली की खिडकीतून
कोवळे उन पहात जा !७!
दारात उभे म्हातारपण
त्याला आत घेणार नाही
उत्साहाने बाहेर भटकेन
त्याच्याकडे लक्ष देणार नाही !८!

– संग्रहित

देवा माझ्यासाठी घेऊ का...

पोट तुझं भरलं असेल तर,
देवा माझ्यासाठी घेऊ का,
तुझं राहिलेलं उष्ट,
माझ्या घरी मी नेऊ का. ?

देवा इथे मात्र तुमची,
मस्त अंगत पंगत रंगलीय,
घरात पीठ नाही म्हणून,
सकाळीच आई बाबासोबत भांडलीय.

मूठभर पिठासाठी,
आई सगळ्या गल्लीत हिंडली,
सगळ्या शेजारच्यांनी,
तुझ्या नैवेद्याची सबब सांगितली.

देवा आज सकाळी मला,
सडकून भूक लागली,
अचानक तुला आठवून,
तुझ्या मंदिराकडे धूम ठोकली.

देवा मला तुझा
कधी कधी हेवा वाटतो,
एका जाग्यावर बसून,
मस्त नैवेद्याचा मलिंदा लाटतो.

दर्शनासाठी आलेल्या लोकांनी,
नारळाचा तुकडा हातावर ठेवला,
तुला मात्र देवा त्यांनी,
अर्धा नारळचं वाहिला.

माफ कर देवा मला,
तुझा घास हिसकावतोय,
अर्ध्या कोर तुकड्यासाठी,
भाऊ माझा घरात रडतोय.

देवा मी आता ठरवलंय,
तुझ्यासोबत बंड करायचं,
माझ्या भाकरीच्या प्रश्नासाठी,
स्वतःच पेटून उठायचं! ***

आयुष्याच्या वाटेवर एका चुकीमुळे साथ सोडणारे भरपूर असतात. पण तीच चूक समजावून सांगून, आयुष्यभर साथ देणारे लाखात एक असतात.

चारोळी...

घरात सोफासेट असो,
डिनरसेट असो,
टीवीसेट असो की
मेकअप सेट असो,
परंतु 'माइंडसेट' नसेल तर
आपण कोठेही
सेट होवू शकत नाही!
म्हणूनच सदैव प्रसन्न रहा!..

****

विचार करण्यात "वेळ"
घालवण्यापेक्षा,
"प्रयत्न"करण्यात दिवस
घालवा.....
कारण विचाराने माणूस
खचतो आणि
"प्रयत्नाने"
प्रगतीच्या "मार्गावर"
पोहचतो....

****

लग्न...!

लग्न.. ते सुंदर जंगल आहे. जिथे बहादुर वाघांची शिकार..हरणी करतात .!!

लग्न म्हणजे...अहो ऐकलत का? पासुन ते...बहिरे झालात कि काय...पर्यंतचा प्रवास!!

लग्न म्हणजेच... तुझ्या सारखे या जगात कुणीच नाही...पासुन... तुझ्या सारखे छप्पन बघीतलेत!!

लग्न म्हणजे...तुम्ही राहुद्या... पासुन ते... मेहरबानी करून, तुम्ही तर राहुच द्या... पर्यंतचा प्रवास...!!

लग्न... कुठे होती माझी राणी...पासुन तर... कुठे मेली होतीस...पर्यंतचा प्रवास!!

लग्न म्हणजेच...तुमचे नशीब मी भेटले तुम्हाला...पासुन ते...मेलं माझच नशीब फुटकं, तुम्ही मला भेटलात...पर्यंतचा प्रवास..!!

वैवाहिक जीवन हे कश्मीर सारखे आहे, सुंदर तर आहे परंतु आतंकपण आहे..!

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०७ * अंक ४९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २५ मार्च २०२४ * किंमत : २ रू.

बायको गेली माहेरी...

थर्टीचा एक पेग
काढुन घेतला बाजुला
स्नॅकससाठी थोडीशी
फोडणी दिली काजुला
फ्रिजमधुन बर्फाचा, ट्रे घेतला ओढुन
गॅलरीमधे जाऊन बसलो
दोन्ही पाय सोडुन ...
बायको गेली माहेरी
तोवर रुबाब करुन घेतोच
आज काय सोडत नाही, पोटभर पितोच..
घरी सगळा शाकाहार
वैताग आलाय यार
आज मात्र चकण्याला
दोन अंडी खातोच...
युट्यबवर बघुन आज
कॉकटेलचा पंच केला
आणि माझ्याच गॅलरीला मी
नाटकाचा रंगमंच केला...
दोन डायलॉग, तीन कविता
चारपाच शायऱ्या झाडुन दिल्या
शेजारणीच्या गॅलरीत पहात
मनातल्या भावना बोलुन दिल्या
कॅराओकेवर चार गाणी,
दिली तिला फेकुन, दोन वेळा ती
गॅलरीतुन, बघुन गेली वाकुन
चौथा पेग होता होता
जुनी मैत्रीण आठवली
मग बदामाची इमेज तिला
वॉटस्पवर पाठवली ...
नमा, सिमा, राणी, ज्योती
आता सगळ्या सुचू लागल्या
पाचव्या पेग नंतर सगळ्या
डोळ्या समोर नाचु लागल्या...
सहाव्या पेग नंतर मी
थोडासा वाघ झालो
नुसता जाळ-धुर नाही
खतरनाक आग झालो
कोण बॉस, कोण बायको
गेले सगळे उडत
सगळ्यांवर फुसफुसत
मी कोब्रा नाग झालो...
दारू मी रोज पित नसतो
प्यायलो की कुणाला भित नसतो
असं म्हणत असतानाच
बायकोचा विडियो कॉल आला
तिचा चेहरा पहाताच मला
दोन नंबरचा कॉल आला...
काय करताय, कुठे आहात,
तडातडा बोलु लागली,
नुसत्या जिभेनं माझी
कातडी सगळी सोलू लागली...
काय नाही आहे घरीच
तत-पप करू लागलो
टिपॉयवरचा कचरा सारा
पिशवी मधे भरू लागलो...
बायको म्हणाली, अरे बेवड्या
गॅस तेवढा मंद कर, मी घरी नसले की
दारू पिणं बंद कर..
काजु करपून खुर झालेला
घर भर धुर झालेला
बिल्डींग मधल्या लोकांचा
दारा बाहेर पुर आलेला...
काय करू काय सुचेना
डोळ्या समोर काय दिसेना
नमा, सिमा, शेजारीण
सगळा विचार सुटला
हाताला ग्लास सुद्धा
खळकन फुटला...
म्हणुन सांगतो मित्रांनो
एक गोष्ट लक्षात ठेवा
दारू प्यायला बसलात की
मोबाईल स्विच ऑफ ठेवा
दारू प्यायला बसलात की
मोबाईल स्विच ऑफ ठेवा.!!!

- संग्रहित

गझल....

क्यूँ नहीं है आप का बीमा,
किसे पता है उम्र की सीमा!!
जिस दिन कुछ भी उपर-नीचे
जीवन में हो जायेगा!
बीमा का निर्णय आपका
सुरक्षा कवच बन जायेगा!!
सारे रिश्ते-नाते झूठे,
कोई काम न आयेगा!
इस बीमा को सगा समझना,
काम आप के आयेगा!!
सुनो कमाना है आसान पर
बचा के रखना है बड़ा कठिन!
आधुनिक जीवन का सच है ये,
करना होगा तुम्हे यकीन !!
इसीलिये परिवार के खातिर,
बीबी बच्चों का रखो ध्यान!
जीवन क्षण भंगुर है प्यारे,
नहीं करना कभी गुमान!!
रोके कभी नही रुक सकता,
जीवन का तूफ़ान कोई !
आखिर सब इन्सान है जग में
नही यहाँ भगवान कोई!!
इसीलिये ऐ परिवार वालो,
बीमा बहुत जरूरी है!
मानो कहना बीमा ले लो
मत समझो मजबूरी है!!
क्यूं की बीमा सिर्फ बीमा नही,
ये हैं आपके अपने परिवार के प्रति,
प्यार का फरमान और...
आपके, बुढापे का स्वाभिमान!! **

तिला विचारलं नाही...

ज्या क्षणी पाहिले तिला...
होकार गृहीतच धरला...!
मी तुला आवडलो का...?
तिला विचारलंच नाही...!!
सप्तपदी चालतांना...
घुटमळली पाऊले तिची...!
हुरहुर कसली होती...?
तिला विचारलंच नाही...!!
माप ओलांडतांना उंबरठ्याचं...
मी आलो सहज आत...!
तुलाही यावंस वाटतंय का...?
तिला विचारलंच नाही...!!
झाली पहिली भेट...
किती आतुर होतो मी...!
ओढ तुलाही आहे का...?
तिला विचारलंच नाही...!!
वंशाला दिवाच हवा...
सांगून मोकळा झालो...!
पण आई व्हायचंय का...?
तिला विचारलंच नाही...!!
संगोपन करतांना मुलांचं...
कसरत होत होती तिची...!
गरज माझीही लागेल का...?
तिला विचारलंच नाही...!!
आयुष्यभर दिली साथ...
झाली सुख दुःखाची सोबती...!
कधी मन तिचं दुःखलं का...?
तिला विचारलंच नाही...!!
न मागताच तिच्याकडून...
घेतलं मी सारं काही...!
तुलाही काही हवं का...?
तिला विचारलंच नाही...!!
खरंच किती स्वार्थी झालो...
गृहीतच धरलं मत तिचं...!
तिचं मन काय म्हणतं...?
तिला विचारलंच नाही...!!
आत्ता विचारल तीला ...
सांग काय हवंय तुला ..!
वय तीचे केव्हा झाले ...
समजलेच नाही समजलेच नाही.!

- संग्रहित

काळ जुना होता....

काळ जुना होता....
अंग झाकायला कपडे नव्हते,
तरीही लोकं शरीर झाकण्याचा प्रयास
करायचे, आज कपड्यांचे भंडार आहेत.
तरीही जास्तीत जास्त शरीर दाखवायचे
प्रयत्न सुरु आहेत...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
काळ जुना होता...
रहदारीची साधने कमी होती. तरीही
कुटुंबातील लोक भेटत असत,
आज रहदारीचे साधने भरपूर आहेत.
अजूनही लोकांना न भेटण्याच्या सबबी
सांगत आहे...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
काळ जुना होता..
घरची मुलगी अख्ख्या गावाची मुलगी
होती. आजची मुलगी ही शेजाऱ्यापासूनच
असुरक्षित आहे...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
*** काळ जुना होता.. ***
लोकं गावातील वडीलधार्यांची
चौकशी करायचे, आज पालकांनाचं
वृद्धाश्रमात ठेवले जाते...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
*** काळ जुना होता.. ***
खेळण्यांचा तुटवडा होता. तरी शेजारची
मुलं एकत्र खेळायचे.
आज खूप खेळणी आहेत, मात्र मुले
मोबाईलच्या कचाट्यात अडकलेली
आहेत...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
*** काळ जुना होता..***
रस्त्यावरील प्राण्यांना सुध्दा भाकरी दिली
जायची, आज शेजारीचं मुलंही
भुकेली झोपी जातात...
समाज सुसंस्कृत झाला आहे..
*** काळ जुना होता..***
शेजारच्या व आपल्या घरी नातेवाईक
भरलेले असायचे, आता परिचय विचारला
तर आज मला शेजारचे नावही
माहीत नाही...
समाज सुसंस्कृत झाला आहे..

***

थांबायचं नाय गड्या थांबायचं नाय...

विकायचं हाय म्हणून फेकायचं हाय !!
फेकलं नाय तर विकायचं काय ?
शिकलो नाय म्हणून फेकायचं हाय !
समद्यांवर छाप मारायची हाय !
मित्रांची साथ देयाची हाय !
दोस्तांसाठी विकायचं हाय !!
मी आईचा नाय !
मी बायकोचा नाय !
मी घरच्या कोणाचाच नाय !!
मी गुरूचा नाय ! मी पार्टीचा नाय !
मी दुनियेत एकटाच शाणा हाय !!
मला जगभर फिरायचं हाय !
फोटू मध्ये चमकायचं हाय !
मले काय बी समजत नाय !
तरी वि श्व गु रू बनायचं हाय !!
भक्त माझे खुळेच हाय !
डोक्यात त्यांच्या मेंदूचं नाय !
त्यांना बी मी विकणार हाय !
किंमत काय मिळायची नाय !!
हिशोब म्या देणार नाय !
कोर्टाला घोडा लावायचा हाय !
कर्जात देश बुडवला हाय !
मला कसली शरमच नाय !!
भीक मी मागितली हाय !
समद्याना सवय लावणार हाय !
झोला माझा रेडीच हाय !
दिवसाढवळ्या पळायचं हाय !!

- संग्रहित

नशिब....

नशिबाला कुणाच्या हसू नये
नशिब कुणी विकत घेत नाही,
वेळेचे नेहमी भान ठेवावे
वाईट वेळ सांगून येत नाही !
बुद्धी कितीही
तल्लख असली
नशिबाशिवाय जिंकता
येत नाही,
बिरबल बुद्धीवान
असला तरीही
राजा तो होऊ
शकला नाही !
एक दुसऱ्यासाठी जगणे
याचेच नाव जीवन असते,
म्हणूनच वेळ त्यांना देणे
ज्यांचे तुमच्यावर प्रेम असते !
नाती तागडीत तोलू नये
पैश्याची ती
गुलाम नसतात,
नात्यात फायदा बघू नये
ती तुम्हाला श्रीमंत
करतात !
तुमच्याकडे मारुती असो वा BMW
रस्ते त्यांचे एकच असतात,
मनगटाला TITAN वा
ROLEX असो
वेळ एकच दाखवत असतात !
मोबाईल APPLE असो
वा SAMSUNG
तुम्हाला फोन करणारे
बदलत नसतात,
Economy आणि
Business Class
प्रवासाला वेळ
सारखाच घेतात!
श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यात
अर्धी श्रीमंती खर्चून जाते,
कमाई कमी जास्त असली तरी
जेवणात पोळी एकाच
आकाराची असते! *

गॅरंटी

लग्नात दोघांनी
सप्तपदी केली
जन्मभर सोबतीची
'गॅरंटी' दिली ।।१।।
महिन्यामध्ये तिला
सोडले वाऱ्यावर
भिखा मागत गेला
जगाच्या दौऱ्यावर ।।२।।
पत्नीला कधीही
साडी घेत नाही
राजाच्या राणीला
हिरा भेट देई ।।३।।
त्याच्याच नावाचं
लावुनिया कुंकू
जन्मभर झुरतेय
बिचारी काकू ।।४।।
कुटुंबाशी नाही
राखले इमान
जगाला गॅरंटीचे
देई आश्वासन ।।५।।

- बाबुराव तिडके
अंबाजोगाई, जि.बीड

कां कुणास ठाऊक

कां कुणास ठाऊक,
कांही कळलंच नाही
मन मात्र म्हणतंय
जगुन आहे मी...
कसा संपला २१ पासून ६०
वयापर्यंतचा हा प्रवास,
कांही कळलंच नाही.
काय मिळवलं, काय गमावलं,
काय गमावलं, कांही कळलंच नाही.
संपलं बाळपण, गेलं तारुण्य
केव्हा आलं ज्येष्ठता,
कांही कळलंच नाही.
काल मुलगा होतो,
केव्हा बाप आणि नंतर
सासरा झालो,
कांही कळलंच नाही.
केव्हा 'बाबा' चा
'आबा' होऊन गेलो,
कांही कळलंच नाही.
कोणी म्हणतं साठी बुद्धी नाठी,
कोणी म्हणतं हाती आली काठी,
काय खरं आहे,
कांही कळलंच नाही.
पहिले आई बापाचं चाललं,
मग बायकोचं चाललं,
मग चाललं मुलांचं,
माझं कधी चाललं,
कांही कळलंच नाही.
बायको म्हणते
आता तरी समजून घ्या ,
काय समजू,
काय नको समजू,
कां कुणास ठाऊक,
कांही कळलंच नाही.
मन म्हणतंय जगुन घे.,
वय म्हणतंय वेडा आहे मी,
या साऱ्या धडपडीत केव्हा
गुडघे झिजून गेले,
कांही कळलंच नाही.
झडून गेले केस,
लोंबू लागले गाल,
लागला चष्मा,
केव्हा बदलला हा चेहरा
कांही कळलंच नाही.
काळ बदलला,
मी बदललो
बदलली मित्र-मंडळीही
किती निघून गेले,
किती राहिले मित्र,
कांही कळलंच नाही.
कालपर्यंत मौजमस्ती
करीत होतो मित्रांसोबत,
केव्हा सीनियर सिटिझनचा
शिक्का लागून गेला ,
कांही कळलंच नाही.
सून, जावई, नातू, पणतू,
आनंदीआनंद झाला,
केव्हा हासलं उदास हे
जीवन,
कांही कळलंच नाही.
भरभरून जगून घे जीवा
मग नको म्हणूस की
मला कांही कळलंच नाही.

- संग्रहित

वन है तो जल है,
जल है तो कल है..!